गुरुवार दि. ३० जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३२९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जावेक्ताहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

कर्जमाफीचा लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण तातडीने करा : प्रशासनाचे आवाहन

# जालना जिल्ह्यात १ लाख ७ हजार ५०५ पात्र शेतकरी


## अद्याप ७८ हजार २१५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी

**जालना -प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरू केली असून, या लाभासाठी आधार प्रमाणीकरण अनिवार्य आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या आणि दि. ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाची मुद्दल व व्याजासह जास्तीत जास्त दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी जालना जिल्ह्यातील सर्व बँकांनी एकूण २ लाख ३




हजार २८३ थकबाकीदार खातेदारांची माहिती महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे. या माहितीच्या आधारे दि. २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या लाभार्थी यादीमध्ये जिल्ह्यातील १ लाख ७ हजार ५०५ पात्र शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

मात्र, या पात्र लाभार्थ्यांपैकी दि. २९ जुलै २०२६ पर्यंत केवळ २९ हजार २९० शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली असून, अजूनही ७८ हजार २१५ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीच्या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने आधार प्रमाणीकरण करून घेण्याचे आवाहन केले आहे.

आधार प्रमाणीकरणासाठी शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार कार्ड व लाभार्थी यादीतील विशिष्ट क्रमांक सोबत न्यावा. केंद्रावर विशिष्ट क्रमांक अथवा आधार क्रमांक प्रविष्ट केल्यानंतर संबंधित शेतकऱ्याच्या कर्ज खात्याची माहिती आणि थकीत कर्जाची रक्कम दिसून येईल. सदर रक्कम मान्य असल्यास शेतकऱ्यांनी सहमती दर्शवून आधार प्रमाणीकरण करावे. जर रक्कमेबाबत शंका अथवा आक्षेप असल्यास असहमती नोंदवूनही आधार प्रमाणीकरण करता येणार आहे.

शेतकऱ्यांनी असहमती नोंदवल्यानंतर संबंधित तक्रार ऑनलाईन पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. त्यानंतर बँकेच्या अभिलेखांच्या आधारे तक्रारीची *(पान २ वर)*

## भररस्त्यातील खुनातील आरोपी अवघ्या चार तासांत जेरबंद

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील स्काऊट-गाईड कार्यालयासमोर भररस्त्यात झालेल्या युवकाच्या खुनाच्या गुन्ह्याचा अवघ्या चार तासांत छडा लावत कदीम जालना पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली. अत्यंत वेगवान व समन्वयपूर्ण तपासामुळे पोलिसांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास रेल्वे स्टेशन रोडवरील स्काऊट-गाईड कार्यालयासमोर एका युवकाचा धारदार शस्त्राने खून झाल्याची माहिती कदीम जालना पोलीस ठाण्याला मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जनार्धन (जे. बी.) शेवाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव व अमित मस्के हे पथकासह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळ तातडीने सील करण्यात आले असून मोबाईल फॉरेन्सिक पथकाला पाचारण करून वैज्ञानिक पद्धतीने पुरावे संकलित करण्यात आले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाबाबत आवश्यक मार्गदर्शन केले.

**कदीम जालना पोलिसांची कामगिरी**

या घटनेत मृत्यू झालेल्या युवकाची ओळख मयूर नंदकिशोर मेंढरे (वय २४, रा. खडकपुरा, जालना) अशी पटली. मयताच्या आईच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४१२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) तसेच शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी पळून जाण्याच्या *(पान २ वर)*

## परतूर-घनसावंगी-अंबड तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थिती

### जायकवाडी धरणातून कालव्यात पाणी सोडण्याची माजी मंत्री तथा आ. बबनराव लोणीकर यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील परतूर, घनसावंगी आणि अंबड तालुक्यात यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. पावसाअभावी जमिनीत ओलावा नसल्याने सोयाबीन, कापूस, मका व इतर खरीप पिके मोठ्या प्रमाणात सुकू लागली आहेत. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांसमोर पिके वाचविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत माजी मंत्री तथा परतूर-मंठा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज राज्याचे जलसंपदा मंत्री यांची भेट घेऊन जायकवाडी धरणातून कालव्यात तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली. परतूर, घनसावंगी आणि अंबड तालुक्यातील वितरिका (मायनर) कालव्यांमध्ये त्वरित पाणी उपलब्ध करून देण्यात



यावे, जेणेकरून शेतकऱ्यांची उभी खरीप पिके वाचू शकतील, अशी विनंती त्यांनी केली. आमदार लोणीकर यांनी मंत्र्यांना सांगितले की, या भागात अत्यल्प पाऊस झाल्याने पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. वेळेत कालव्यांद्वारे पाणी उपलब्ध झाल्यास हजारो हेक्टरवरील खरीप पिकांना दिलासा मिळू शकतो. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, *(पान २ वर)*




आज गुरुपौर्णिमेनिमित्त नरिमन नगर मध्ये स्वामी समर्थ मंदिरात गुरुचे पूजन करण्यात आले असून गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ***छायाचित्र किरण खानापुरे***

## कर्जमाफीतील तफावत दूर करा, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख प्रोत्साहनपर अनुदान द्या; विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### १५ ऑगस्टपासून बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा; वंचित शेतकऱ्यांना न्याय देण्याची शासनाकडे मागणी

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनांचा लाभ देताना होत असलेली तफावत दूर करावी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ₹२ लाखांचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे तसेच विविध कर्जमाफी योजनांपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी आज जालना जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी नारायण उगले, रमेश



लोखंडे, अमोल गावंडे, संजय जाधव, विजय भवर, आनंद कुहिरे आदी उपस्थित होते. निवेदनाद्वारे शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत अनेक पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या रकमेबाबत मोठी विसंगती दिसून येत आहे. बँकेकडील मूळ कर्ज, बँकेने दाखविलेली थकबाकी, कर्जमाफीच्या यादीतील रक्कम आणि ई-केवायसी पोर्टलवर दिसणारी रक्कम या सर्वांमध्ये मोठी तफावत असल्याने शेतकरी संभ्रमात असून त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाने या सर्व प्रकरणांची पडताळणी करून पात्र शेतकऱ्यांना योग्य लाभ द्यावा, अशी मागणी करण्यात आली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांबाबतही निवेदनात महत्त्वाची मागणी करण्यात आली आहे. शासनाने पूर्वी जाहीर केलेल्या ₹५० हजारांच्या प्रोत्साहनपर अनुदानाऐवजी नियमित कर्जफेड करणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांना ₹२ लाखांचे प्रोत्साहनपर अनुदान देऊन त्यांना न्याय द्यावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तसेच सन २०१२ ते २०१९ पूर्वी कर्ज घेतलेल्या आणि कोणत्याही कर्जमाफी योजनेचा लाभ न *(पान २ वर)*

## ऑनलाईन मटका व जुगार अड्ड्यावर तीर्थपूरी पोलिसांची धाड

### *नऊ आरोपींवर गुन्हा, ₹२ लाखांचे महागडे मोबाईल जप्त, व्हॉट्सअॅपद्वारे मधुर ओपन, कल्याण ओपन, टाईम बाजार व मेन बाजार नावाने सुरू होता ऑनलाईन मटका व्यवसाय*

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील तीर्थपूरी येथे सुरू असलेल्या ऑनलाईन मटका व जुगार व्यवसायावर तीर्थपूरी पोलिसांनी धडक कारवाई करत नऊ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत विविध कंपनींचे महागडे मोबाईल फोन असा एकूण ₹२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ऑनलाईन माध्यमातून सुरू असलेल्या जुगाराच्या रॅकेटला मोठा धक्का बसला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तीर्थपूरी येथील सतीश किसनराव काळे व संतोष किसनराव काळे यांनी आपल्या राहत्या घरात ऑनलाईन जुगाराचा सेटअप उभारला होता. या व्यवसायासाठी मंठा येथील राहुल बोराडे याची तांत्रिक मदत घेतली जात होती. त्याचबरोबर आणखी सहा जणांना हाताखाली ठेवून मोबाईलवरील व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून मधुर ओपन, कल्याण ओपन, टाईम बाजार आणि मेन बाजार या नावाने ऑनलाईन मटका खेळविण्याचा व्यवसाय सुरू होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास तीर्थपूरी येथील आरोपींच्या राहत्या घरी छापा टाकला. छाप्यादरम्यान आरोपी मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाईन मटका खेळत व खेळवत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सर्व आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक १७३/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईदरम्यान आरोपींच्या ताब्यातून वन प्लस, आयफोन, १६ प्रो, सॅमसंग एस २५ अल्ट्रा, आणि ओपो कंपनीचे महागडे मोबाईल फोन जप्त करण्यात आले. या मोबाईलची एकूण किंमत ₹२,००,००० इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींची नावे सतीश किसनराव काळे (वय ३६, रा. तीर्थपूरी) संतोष किसनराव काळे (वय ३०, रा. तीर्थपूरी) अभिषेक अशोक दहीभाते (रा. तीर्थपूरी), महेश अशोक दहीभाते (रा. तीर्थपूरी) बाळासाहेब सर्जेराव कोकाटे (रा. तीर्थपूरी), उमेश प्रकाश राजगुरू (रा. तीर्थपूरी), योगेश बालू कानडे (रा. तीर्थपूरी), गणेश दत्तात्रय वाघराळे (रा. तीर्थपूरी), राहुल बोराडे (रा. मंठा, ता. मंठा, जि. जालना)

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (अंबड) सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गडाक, पोलीस कर्मचारी प्रतिभा पठाडे *(पान २ वर)*

## लोकशाही मूल्यांचा संस्कार; श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी संसदेची स्थापना

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व क्षमता, जबाबदारीची जाणीव आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन व्हावे या उद्देशाने श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूल, जालना येथे विद्यार्थी संसदेची स्थापना उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शालेय नियमांनुसार पारदर्शक व लोकशाही पद्धतीने राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदानाचा हक्क बजावला.

निवडणूक प्रक्रियेचे नियोजन, मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर करण्याचे काम शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले. उद्धव टेहरे, विक्रांत चीलकरवार, रमेश काळे, वीणा जोशी, सोनिया गजले आणि स्मिता देशमुख यांनी या प्रक्रियेसाठी विशेष परिश्रम घेतले.



नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींना शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमा कुलकर्णी यांनी शुभेच्छा देत, विद्यार्थी संसद ही केवळ पदाची जबाबदारी नसून विद्यार्थ्यांचे नेतृत्व, शिस्त, सेवा आणि आदर्श वर्तन यांचा संगम असल्याचे सांगितले. शाळेच्या प्रगतीसाठी व विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी प्रतिनिधींना केले.

या निवडणुकीत इयत्ता १० वी व ९ वीच्या विविध तुकड्यांमधील एकूण १५ विद्यार्थी प्रतिनिधी निवडून आले. त्यामध्ये अंजली वाहुले, श्रावण जाधव, श्रावण कलशेट्टी, यश तोष्णीवाल, दक्ष भंडारी, समीर रत्नपारखी, करणवीर अलग, रुद्रांश जुंबड, स्वरूप वानखेडे, जीत गोहेल, परिधी अंबड, ऋतुजा गाडिया, वंशिका गुजर, समकिता रुणवाल आणि सेजल धारिवाल यांचा समावेश आहे.

विद्यार्थी संसदेमुळे विद्यार्थ्यांना शालेय प्रशासनाच्या *(पान २ वर)*

# संपादकीय...

## खड्डे, घाण आणि प्रदूषण; जबाबदारी नेमकी कोणाची?

जालना शहरातील पंचमुखी महादेव मंदिर परिसरातील रस्त्यांची दुरवस्था, कुंडलिका नदीचे वाढते प्रदूषण आणि अस्वच्छतेचा प्रश्न हा केवळ एका परिसराचा विषय राहिलेला नाही. तो महानगरपालिकेच्या विविध विभागांतील समन्वयाचा अभाव, प्रशासनातील जबाबदारीची अनास्था आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबतच्या उदासीनतेचे प्रतीक बनला आहे.

पाणीपुरवठा पाइपलाइन दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर खोदलेले रस्ते तातडीने पूर्ववत करणे ही संबंधित यंत्रणेची प्राथमिक जबाबदारी असते. परंतु पंचमुखी महादेव मंदिराजवळ आजही केवळ माती टाकून खड्डे बुजविण्यात आले आहेत. त्यावर ना गट्टू बसविण्यात आले, ना डांबरीकरण झाले. अधिक चिंतेची बाब म्हणजे, याबाबत पाणीपुरवठा विभाग आणि बांधकाम विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. अशा प्रकारचा हे आमचे काम नाही हा पवित्रा नागरिकांच्या समस्या अधिक गंभीर बनवतो. श्रावण महिना सुरू झाल्याने पंचमुखी महादेव मंदिरात दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येत आहेत. काही दिवसांत पद्मशाली समाजाचा बागल पांडू उत्सवही होणार आहे. अशा वेळी रस्त्यावरील खड्डे केवळ गैरसोयीचे नसून ते अपघाताला आमंत्रण देणारे आहेत. एखादा अपघात झाल्यानंतर जबाबदारी कोण स्वीकारणार, हा प्रश्न प्रशासनाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. याहून गंभीर बाब म्हणजे कुंडलिका नदीतील वाढते प्रदूषण. काही हॉटेल व्यावसायिकांकडून अन्नकचरा आणि सांडपाणी नदीत सोडले जात असल्याच्या तक्रारी नवीन नाहीत. नदी ही केवळ पाण्याचा प्रवाह नसून पर्यावरणाची जीवनवाहिनी असते. धार्मिक स्थळालगत वाहणाऱ्या नदीत कचरा टाकणे म्हणजे पर्यावरणाबरोबरच श्रद्धेचाही अपमान आहे. अशा प्रकारांवर केवळ सूचना देऊन भागणार नाही; नियमित तपासणी, दंडात्मक कारवाई आणि सातत्यपूर्ण देखरेख आवश्यक आहे.

मंदिर परिसरातील अस्वच्छ मैदान आणि कचऱ्याचे ढीग हे देखील शहराच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. धार्मिक स्थळे ही शहराची ओळख असतात. भाविकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज वातावरण उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. स्वच्छता ही केवळ मोहीम नसून सातत्याने राबविण्याची प्रशासनाची संस्कृती असली पाहिजे. नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले आणि नगरसेविका पूजा भगत यांनी या प्रश्नांकडे आयुक्तांचे लक्ष वेधले आहे. निवेदन देणे हा लोकप्रतिनिधींचा अधिकार आणि कर्तव्य आहे. मात्र, त्यानंतर प्रशासनाने किती तत्परतेने कृती केली, यावरच नागरिकांचा विश्वास टिकून राहणार आहे. निवेदनांची दखल केवळ फाईलपुरती न राहता प्रत्यक्ष कामांमध्ये दिसली पाहिजे.

जालना शहर स्मार्ट, स्वच्छ आणि सुस्थितीत ठेवायचे असेल तर विभागांमधील समन्वय मजबूत करावा लागेल. खोदकाम करणाऱ्या विभागानेच रस्ता पूर्ववत करण्याची सक्ती, नदी प्रदूषणावर झिरो टॉलरन्स धोरण, धार्मिक स्थळांभोवती नियमित स्वच्छता आणि कामांवर प्रभावी देखरेख ही आता काळाची गरज आहे. श्रद्धास्थानांची प्रतिष्ठा, पर्यावरणाचे संवर्धन आणि नागरिकांची सुरक्षितता यावर कोणतीही तडजोड होऊ नये. प्रशासनाने विभागीय जबाबदारीच्या खेळातून बाहेर पडत तात्काळ आणि परिणामकारक कृती केली, तरच नागरिकांचा विश्वास दृढ होईल. अन्यथा, प्रत्येक श्रावणात तेच खड्डे, तीच घाण आणि तीच आश्वासने अशीच परिस्थिती कायम राहील.

# दिल्लीत पायलट गन आणि बिहारमध्ये एके-४७ विद्यार्थ्यांवर चालविने ही कुठली लोकशाही? देशात हे चाललय तरी काय!

जेन-झी पुढे सरकार झुकले खरे; परंतु सरकारने दिलेले आश्वासने पुर्ण करतात की नाही यात अजूनही विद्यार्थ्यांच्या व देशाच्या १४५ कोटी जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे!कारण जे काम सुरक्षा विभागाने करायला नको ते काम सुरक्षा विभागाने करून लोकशाहीला आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला कलंकीत केले आहे.कारण दिल्लीत पायलट गनचा वापर करून सरकारवर चहुबाजुंनी प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे,तर बिहारमध्ये सीवान येथे सुरक्षा विभागाने आंदोलकांवर एके -४७ चा वापर करून देशाला व संविधानाला धक्का दिला असून घृणास्पद कार्य केले आहे.पायलट गन किंवा एके-४७ आतंकवादी कारवाईसाठी किंवा खुंखार गुन्हेगारांसाठी वापरली जाते.परंतू ती विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला दरम्यान वापरण्यात आली.याची सविस्तर माहिती सरकारने व गृहमंत्रालयाने १४५ कोटी जनतेला दिली पाहिजे. कारण संपूर्ण सुरूक्षा यंत्रणा गृहमंत्रालयाच्या अंतर्गत येत असते.आंदोलन पांगवण्यासाठी सुरक्षा यंत्रणांजवळ अनेक उपाय आहेत यामध्ये सर्वप्रथम वॉटर कॅनलचा वापर केला जातो.परंतु या आंदोलनात थेट लाठीचार्ज, पायलट गन, बिहारमध्ये एके -४७ चार वापर करण्यात आला.देशातील युवा पिढीला आपल्या हक्कांसाठी लढण्याचा संपूर्ण अधिकार संविधानाने दिलेला आहे त्या संविधानानुसार आंदोलन सुरू असतांना बळाचा वापर करण्यात आला.विद्यार्थांना आपल्या न्यायासाठी तब्बल ३५ दिवस कडवा संघर्ष करावा लागला आणि ३६ व्या दिवशी विद्यार्थ्यांना न्याय मिळाला.सरकारला सत्तेचा एवढा अहंकार चढला होता की, हे राजीनामा देणारे सरकार नाही असे घमंड त्यांच्यात निर्माण झाले होते आणि त्यांच्या मंत्र्यांनी बोलून सुध्दा दाखविले होते.अशी बतावणी करणाऱ्या भाजप नेतृत्वाला देशातील युवा शक्तीपुढे नमते घ्यावे लागले.विद्यार्थांचे आंदोलन फक्त दिल्ली पुरतेच सिमित नव्हते तर हे आंदोलन देशातील अनेक राज्यात तिव्र झाले होते. दिल्लीप्रमाणेच देशातील इतर राज्यांमध्ये सरकारने बळाचा वापर केला.दिल्लीतील आंदोलना दरम्यान सुरक्षा विभागाने बळाचा वापर करतांना पायलट गनचा वापर केला तर, बिहारमध्ये एके ४७ चा वापर केला.म्हणजे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पांगवण्यासाठी अशा भयानक शस्त्राचा वापर करने म्हणजे सरकारची क्रुरताच म्हणावी लागेल.कारण कोणत्याही अधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय अत्याधुनिक शस्त्राचा वापर होऊच शकत नाही आणि तो आंदोलना दरम्यान झाला आहे याची कठोर चौकशी व्हायला हवी.आता प्रश्न आहे की, सरकारने सीजेपीला दिलेले संपूर्ण आश्वासन केव्हा पर्यंत पूर्ण होते.कारण सरकारने दिलेले संपूर्ण आश्वासन देशातील प्रत्येक राज्यांना लागू होते.दिल्लीसह राज्यातील अनेक भागातील विद्यार्थ्यांवर दाखल केलेले संपूर्ण फौजदारी गुन्हे मागे घेतले की नाही यात शंका कुशंका विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नीट-यूजी परीक्षेची पेपरफुटी प्रकरणी जलदगती न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला कारण पेपरफुटी प्रकरणांमध्ये जलद सुनावणी व्हावी याचे मनापासून स्वागत. हा निर्णय सरकारने अगोदरच घेतला असता व धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा घेतला असता तर विद्यार्थ्यांना रस्त्यावर येण्याची वेळ आली नसती हेही तितकेच सत्य आहे.सरकारने नीट-यूजी पेपर फुटीसाठी स्थापन केलेल्या फास्ट ट्रॅक कोर्टात पहिल्याच दिवशी सीबीआय वकिल गैरहजर होते त्यामुळे विद्यार्थ्यांना जलदगतीने न्याय मिळेल की नाही यातही शंका निर्माण होते.पेपरफुटी हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळला जाणारा गोरखधंदा म्हणावा लागेल आणि याचा उगम लालसेपोटी भ्रष्टाचारातुनच झालेला आहे हेही तितकेच सत्य आहे. देशात हे जे काही चालले आहे ते फक्त वाममार्गाने पैसा कमविण्यासाठी त्यामुळे आज देशात फक्त पेपरफुटीच नाही अनेक सरकारी विभाग भ्रष्टाचाराने माखलेले दिसून येतो म्हणजेच सर्वत्र फुटीच-फुटी दिसून येईल.महाराष्ट्रात माननीय तुकाराम मुंढे यांची ज्या-ज्या क्षेत्रात आपले पाय रोवले त्या-त्या क्षेत्रातील भ्रष्टाचार उघडकीस आणला. यावरून स्पष्ट होते की देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे जाळे विणल्या गेले आहेत आणि याचे संपूर्ण धागेदोरे हे राजकीय पुढाऱ्यांच्या हातात व उच्च पदस्थ अधिकाऱ्याच्या हातात आहे.भ्रष्टाचार करण्यामध्ये सरकारमध्ये बसलेले मोठमोठे राजकीय पुढारी व नामी अधिकारी सुद्धा सहभागी आहेत.कारण यांच्याजवळ असलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आलीच कोठून हा मोठा गहन प्रश्न आजही उपस्थित होतो.आजही जगात भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत अव्वल स्थानावर असल्याचे दिसून येते आणि पेपर फुटीचा प्रकार हा भ्रष्टाचाराचाच मोठा भाग आहे.सरकारने असे समजू नये जंतरमंतर खाली झाले म्हणून आम्ही आपल्याच पध्दतीने काम करू ही सरकारची मोठी भुल ठरेल.त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांना दिलेल्या आश्वासनांची ताबडतोब पुर्तता करावी व ही पुर्तता देशातील संपूर्ण राज्यातील आंदोलकांना लागू राहील याचीही खबरदारी सरकारने घ्यावी.सरकार म्हणते की, विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा कोणतेही पद मोठे नाही.म्हणून धर्मेंद्र प्रधानचा राजीनामा दिला.अशा पध्दतीचे लिपापोती लावणारे वक्तव्य सरकारने बंद करावे.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की, प्रथम देश व देशाची १४५ कोटी जनता नंतर मंत्री आणि राजकारण. सरकारने लाठीचार्ज व बळाचा वापर केल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला आणि आता सरकार मोठ्या ऐटीत सांगते की विद्यार्थ्यांच्या हितासाठी राजीनामा दिला अशा भुलथापा सरकारने मारू नये कारण जेन-झी हुशार आहे त्यांना सर्वच गोष्टी चांगल्या प्रकारे समजते.सरकारने परीक्षा व्यवस्था पारदर्शक, सुरक्षित बनविण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून टास्क फोर्सचे गठन केले यामुळे परीक्षा व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.त्याच पध्दतीने देशातील वाढत्या भ्रष्टाचाराची जळेमुळे खुप दुरवर पोहोचली आहे आणि सरकार यावर अजूनपर्यंत नियंत्रण ठेवू शकली नाही म्हणूनच पेपर फुटी झाली.कारण यात मोठ्या प्रमाणात आजी माजी आमदार-खासदार, मंत्री व राजकीय पुढारी लिप्त आहेत.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून टास्क फोर्सचे ताबडतोब गठन करून भ्रष्टाचाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे आणि पेपर फुटीसारख्या प्रकरणावर आळा घातला पाहिजे.जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पान १ व ४ वरुन...

### जालना जिल्ह्यात...

शहानिशा करून आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल आणि सुधारित माहिती पुन्हा पोर्टलवर अपलोड केली जाईल. याशिवाय, आधार प्रमाणीकरणासाठी आपले सरकार सेवा केंद्र चालकास कोणत्याही प्रकारचे शुल्क देण्याची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

त्यामुळे कोणत्याही अफवा किंवा संभ्रमाला बळी न पडता पात्र शेतकऱ्यांनी विनाशुल्क आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया वेळेत पूर्ण केल्यास पात्र शेतकऱ्यांच्या थकीत कर्जमाफीची कार्यवाही पूर्ण होऊन त्यांना भविष्यात नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्गही सुकर होणार आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करून शासनाच्या महत्त्वाकांक्षी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना श्री. रोडगे यांनी केले आहे.

### भररस्त्यातील खुनातील...

तयारीत; पोलिसांनी सेलूतून पकडले गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ गोपनीय माहिती, सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांची चौकशी आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीची ओळख निश्चित केली. तपासादरम्यान आरोपी जालना जिल्हा सोडून परराज्यात पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. गुप्त माहितीच्या आधारे आरोपी सेलू (जि. परभणी) येथे असल्याचे निष्पन्न होताच पोलिसांनी मध्यरात्री विशेष पथक रवाना केले. दि. २९ जुलै रोजी पहाटे सुमारे २ वाजता, म्हणजेच गुन्हा घडल्यानंतर अवघ्या चार तासांत आरोपीला शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव यश शिवलिंग वीर (वय २२, रा. म्हाडा कॉलनी, शिवाजीनगर, नवीन जालना) असे आहे. त्याला जालना येथे आणून सखोल चौकशी करण्यात आली असून न्यायालयीन प्रक्रियेनंतर औपचारिक अटक करण्यात आली. हत्यार जप्तीची कारवाई सुरू

पोलिसांकडून आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेले धारदार शस्त्र तसेच अन्य महत्त्वाचे पुरावे जप्त करण्याची कारवाई सुरू आहे. या खुनामागील नेमके कारण, पूर्ववैमनस्य किंवा इतर कोणता हेतू होता का, याचा तपासही सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव करीत आहेत. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची कारवाई

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव, अमित मस्के, पोलीस उपनिरीक्षक दिनकर मोरे, तसेच सचिन चौधरी, सदा राठोड, मतीन शेख, इम्रान खान, साळवे, संदीप चव्हाण, विलास राऊत, दिलीप गायकवाड, दीपक अंभोरे, धम्मपाल सुरडकर आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे, भररस्त्यात घडलेल्या गंभीर खुनाच्या गुन्ह्याचा अवघ्या चार तासांत छडा लावून आरोपीला अटक करण्यात कदीम जालना पोलिसांना यश आल्याने त्यांच्या तत्परतेचे आणि प्रभावी तपासकौशल्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

### परतूर-घनसावंगी...

परतूर, घनसावंगी आणि अंबड तालुक्यातील शेतकऱ्यांनीही शासनाने त्वरित निर्णय घेऊन जायकवाडी धरणातून कालव्यात पाणी सोडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यावेळी मतदारसंघातील दुष्काळसदृश परिस्थिती, पिकांची अवस्था आणि शेतकऱ्यांसमोरील अडचणी यांची सविस्तर माहिती मंत्री महोदयांना देण्यात आली. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. संबंधित अधिकाऱ्यांनी उद्यापासून जायकवाडी धरणातून कालव्यात पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती दिली.

### कर्जमाफीतील तफावत...

मिळालेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना किंवा महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळाल्यानंतरही अनेक शेतकऱ्यांना नव्याने पीककर्ज मिळाले नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून, अशा शेतकऱ्यांना तातडीने नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना या तिन्ही योजनांचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांचा विशेष समावेश करून त्यांनाही ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफी किंवा समतुल्य प्रोत्साहनपर अनुदान देण्याची मागणी करण्यात आली. निवेदनातील प्रमुख मागण्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील रक्कम, बँकेची थकबाकी आणि पोर्टलवरील रकमेतील तफावत तातडीने दूर करावी. ₹२ लाखांपेक्षा जास्त आणि ₹२ लाखांपेक्षा कमी कर्ज असलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या स्वतंत्र याद्या जाहीर करून सर्वांना कोणत्याही अटींशिवाय ₹२ लाखांपर्यंत कर्जमाफी द्यावी. नियमित कर्जफेड करणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांना ₹२ लाखांचे प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. सन २०१२ ते २०१९ पूर्वी कर्ज घेतलेल्या व कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी. कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतरही पीककर्ज न मिळालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नवीन पीककर्ज मंजूर करावे. तीनही कर्जमाफी योजनांपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांचा समावेश करून त्यांनाही लाभ द्यावा.

डीसीसी बँकेकडून जामीन असूनही कर्ज न मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने कर्जवाटप करावे.

राज्यातील कोणताही पात्र शेतकरी कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर अनुदानापासून वंचित राहणार नाही, याची शासनाने हमी द्यावी.

१५ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा

शेतकऱ्यांच्या या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास १५ ऑगस्ट २०२६ पासून जालना जिल्ह्यात राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. तसेच या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

### ऑनलाईन मटका...

हेड कॉन्स्टेबल बर्डे, बाळासाहेब मंडलिक, विजय पवार, राजेंद्र जाटे, कोकणे, वैराळ आणि नवल फौलाणे यांनी सहभाग घेतला. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला असून, या ऑनलाईन जुगार रॅकेटचे इतर जिल्ह्यांशी किंवा राज्याबाहेरील नेटवर्कशी काही संबंध आहेत का, याचाही तपास केला जात असल्याची माहिती मिळाली आहे.

### लोकशाही मूल्यांचा...

कार्यपद्धतीची ओळख होण्याबरोबरच नेतृत्व, निर्णयक्षमता, संघभावना आणि सामाजिक उत्तरदायित्व यांसारखे गुण विकसित होण्यास मोठी मदत होणार असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

### ९ वी व ११...

३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आहे. मागील वर्षात (२०२५-२६) या योजनेचा लाभ घेतलेल्या इयत्ता ९ वी आणि ११ वी च्या विद्यार्थ्यांनी देखील चालू शैक्षणिक वर्षासाठी आपल्या अर्जांचेनूतनीकरण () करणे आवश्यक आहे. या योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर () ऑनलाइन नोंदवावेत. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी आपापल्या शाळेतील मुख्याध्यापक किंवा नोडल शिक्षकांशी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन अंनतकदम, सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### पेपरफुटी प्रकरणी...

अधिकारी, कर्मचारी व दलालांवर गुन्हे दाखल करून निलंबन, भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित करणे, स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र सक्षम यंत्रणा स्थापन करणे आणि संबंधित मंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा देणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

यावेळी तालुकाध्यक्ष कृष्ण पडूळ, किसन जेठे, शेख शमशुद्दीन, सागर चौधरी, कलीम खान, वासिम खान पठाण, शेख इब्राहिम, शेख शकील, शेख वासिम, बाबासाहेब सोनवणे, मोईस अन्सारी, रघुवीर गुडे, शेख जमीर, आदित्य चंदनकर, दिनेश सुराणा, प्रमोद आल्हाट, नूर मोहम्मद, इम्रान पठाण, अर्जुन मसुरे, इरफान शेख, नेल्सन कांबळे, वैभव निर्मल, दिग्विजय धांडगे, सय्यद रज्जाक, अंकुश शिंदे, भरत लोढा, योगेश वर्मा यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनाच्या शेवटी, स्पर्धा परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार सहन केला जाणार नाही. शासनाने तातडीने कठोर निर्णय घेऊन दोषींवर कारवाई करावी, अन्यथा राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला.

**विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही : डॉ. विशाल धानुरे**

ड्रग इन्स्पेक्टर भरती व टीईटी पेपरफुटीमुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि संबंधित मंत्री दादा भुसे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. शासनाने त्वरित निर्णय घेतला नाही, तर राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा शहर महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांनी दिला.

### शासकीस मुलींच्या...

स्थळावर शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह गृहपाल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### उपाहारगृहात बिल ...

देतो, तेव्हाच अन्नाची किंमत ठरलेली असते. त्यामुळे बिलात परस्पर जादा आकारणी करणे हा ग्राहकांची फसवणूक आणि अनुचित व्यापार पद्धतीचा प्रकार आहे.

सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आले. उपाहारगृहाच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी हे शुल्क कधीही सक्तीचे केले नव्हते आणि ग्राहकांनी विनंती केल्यास ते शुल्क मागे घेतले जात होते. तसेच देशाभरात १८० हून अधिक उपाहारगृहे असल्याने बिलिंग सॉफ्टवेअरमध्ये बदल करण्यास वेळ लागला, परंतु आता १ मे २०२५ पासून त्यांनी हे शुल्क पूर्णपणे बंद केले आहे, असा दावा त्यांनी केला. दुसरीकडे, प्राधिकरणाने आणि तपास अहवालाने असा प्रतियुक्तिवाद केला की, दिल्ली उच्च न्यायालयाने २८ मार्च २०२५ च्या निकालात स्पष्ट केले होते की सेवा शुल्क आपोआप बिलात जोडता येणार नाही आणि ते केवळ ग्राहकांच्या इच्छेवर (टीप म्हणून) सोडले पाहिजे. न्यायालयाच्या आदेशानंतरही सॉफ्टवेअरमध्ये आपोआप शुल्क जोडणे ही कायदेशीर नियमांची पायमल्ली आहे. प्राधिकरणाने स्पष्ट निरीक्षण नोंदवले की, एखादे शुल्क ऐच्छिक असल्याचे सांगून ते सॉफ्टवेअरद्वारे आपोआप बिलात जोडणे हा ग्राहकांची दिशाभूल करण्याचाच प्रकार आहे.

या ऐतिहासिक निर्णयावर भाष्य करताना ॲड. महेश एस. धन्नावत यांनी सांगितले की, ''केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाचा हा आदेश म्हणजे सामान्य ग्राहकांच्या हक्कांचा विजय आहे. अनेकदा उपाहारगृहे सॉफ्टवेअरच्या माध्यमातून बिलामध्ये चोरट्या मार्गाने सेवा शुल्क जोडतात आणि ग्राहक माहितीअभावी किंवा संकोचापोटी ते भरतात. ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार कोणत्याही सेवेचे शुल्क ग्राहकावर सक्तीने लादणे हा अनुचित व्यापार व्यवहार मानला जातो. या निर्णयामुळे आता प्रत्येक हॉटेल व्यावसायिक आणि उपाहारगृहाला आपल्या बिलिंग प्रणालीत बदल करावा लागेल. ग्राहकांनी यापुढे बिलाची बारकाईने तपासणी करावी आणि जर कोणी अनधिकृतपणे सेवा शुल्क आकारत असेल तर त्याविरुद्ध त्वरित आवाज उठवून राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन क्रमांक १९१५ वर तक्रार नोंदवावी.


### अपंग जनता दलाच्या ...

अनिस शेख, राज्याध्यक्ष जाकीर शेख, राज्य कार्याध्यक्ष भाऊसाहेब दसपुते, राज्य महासचिव राजीक शहा, राज्य उपाध्यक्ष गणेश मगर, राज्य सचिव कलीम शेख, मयूर मेश्राम, राहुल वानखेडे, जालना जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, राजेंद्र चेके नाशिक जिल्हाध्यक्ष बंडू बाई संतोष मोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

अपंग जनता दलाने या बैठकीला दिव्यांगांच्या हक्काच्या लढ्याला मिळालेले महत्त्वपूर्ण यश मानले असून, संघटनेने मांडलेल्या मागण्यांवर लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्यात येतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# शिर्डीत चिल्ड्रेन ऑफ गॉडच्या भव्य ट्रेलर व संगीत लोकार्पण सोहळ्यात साईबाबांचा तृतीयपंथीय समाजावरील करुणा आणि समतेचा संदेश घुमला

शिर्डी, महाराष्ट्र : साईनगरी शिर्डी येथे अत्यंत भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात आगामी हिंदी चित्रपट चिल्ड्रेन ऑफ गॉड च्या ट्रेलर आणि संगीताचे भव्य लोकार्पण करण्यात आले. साईबाबांच्या कृपाशिर्वादाने पार पडलेल्या या सोहळ्याने करुणा, समता आणि सर्वसमावेशकतेचा महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश दिला. साईबाबांबद्दलच्या अनेक कथा आणि प्रवचनांमध्ये असा उल्लेख आढळतो की, त्यांनी तृतीयपंथीय समाजालाही परमेश्वराची विशेष कृपा लाभलेली मानली आणि समाजाने त्यांच्याशी सन्मान, प्रेम व आपुलकीने वागावे, असा संदेश दिला. याच विचारांना पुढे नेत, सत्य घटनेवर आधारित चिल्ड्रेन ऑफ गॉड या चित्रपटाचा शुभारंभ शिर्डीत करण्यात आला. हा चित्रपट लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन प्रत्येक व्यक्तीचा सन्मान आणि स्वीकार करण्याचा संदेश देतो. या भव्य सोहळ्यास चित्रपट निर्माते व अभिनेते औशीम खेतरपाल, दिग्दर्शक आशिष सक्सेना, आरती खेतरपाल, राधिका खेतरपाल, श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी




अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर, *साई बाबा पीस अवॉर्ड्स*च्या आंतरराष्ट्रीय रणनीती सल्लागार संजना जॉन तसेच चित्रपटातील कलाकार आणि संपूर्ण टीम उपस्थित होती. कार्यक्रमातील सर्वाधिक भावनिक क्षण म्हणजे जगातील विविध देशांचा प्रवास करून शिर्डीत पोहोचलेल्या पवित्र मशालीचे प्रज्वलन. औशीम खेतरपाल यांनी मान्यवर आणि प्रसारमाध्यमांच्या उपस्थितीत या मशालीचे प्रज्वलन केले. यानंतर उपस्थितांना या ऐतिहासिक मशालीला स्पर्श करण्याची दुर्मिळ संधी मिळाली, ज्यामुळे हा सोहळा अधिकच संस्मरणीय आणि आध्यात्मिक ठरला. संगीत लोकार्पण सोहळ्यात आरती खेतरपाल यांनी साईभक्तीने ओतप्रोत भरलेले भावपूर्ण भजन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर राधिका खेतरपाल यांनी सादर केलेल्या देखण्या ओडिसी नृत्याविष्काराला उपस्थित मान्यवर, माध्यम प्रतिनिधी आणि पाहुण्यांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. या सांस्कृतिक सादरीकरणानंतर *चिल्ड्रेन ऑफ गॉड*चा अधिकृत ट्रेलर आणि गीते प्रदर्शित करण्यात आली. यावेळी श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर म्हणाले, ''साईबाबांनी दिलेला समाजकल्याणाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरतो. करुणा, समानता आणि स्वीकार हीच बाबांची खरी शिकवण आहे. औशीम खेतरपाल यांचा चिल्ड्रेन ऑफ गॉड हा चित्रपट या मूल्यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करेल, असा मला विश्वास आहे. यापूर्वीही त्यांनी साईबाबांवरील चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमधून बाबांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवले आहेत. हा चित्रपटही तृतीयपंथीय समाजाकडे अधिक संवेदनशीलतेने आणि सन्मानाने पाहण्याची प्रेरणा देईल.'' चित्रपटाविषयी बोलताना औशीम खेतरपाल म्हणाले, ''चिल्ड्रेन ऑफ गॉड हा केवळ चित्रपट नाही, तर स्वीकार, स्वाभिमान आणि मानवतेचा भावनिक प्रवास आहे. सत्य घटनेवर आधारित या कथेद्वारे प्रत्येक व्यक्तीकडे कोणतेही लेबल न लावता प्रेम, आदर आणि समानतेने पाहण्याचा संदेश आम्ही देऊ इच्छितो. साईबाबांच्या करुणा आणि मानवतेच्या भूमीत, शिर्डीत या चित्रपटाचे लोकार्पण होणे आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि अर्थपूर्ण आहे.'' सत्य घटनेवर आधारित चिल्ड्रेन ऑफ गॉड हा चित्रपट अमित नावाच्या तरुणाची कथा सांगतो. स्वतःच्या ओळखीमुळे समाजाकडून नाकारला गेलेला, उपेक्षित आणि एकाकी झालेला अमित घर सोडण्यास भाग पडतो. तृतीयपंथीय समाजात त्याला स्वीकार मिळतो आणि तो अमिता म्हणून स्वतःची खरी ओळख स्वीकारतो. आयुष्य पुन्हा एकदा कठीण वळणावर येते तेव्हा औशीम नावाचा संवेदनशील मार्गदर्शक त्याला नव्याने जगण्याची आशा देतो आणि खरी ओळख समाज ठरवत नाही, तर ती धैर्याने स्वतः स्वीकारावी लागते, हे शिकवतो. संघर्ष, वेदना, परिवर्तन आणि आत्मसन्मानाचा हा प्रेरणादायी प्रवास प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार अधोरेखित करतो. या चित्रपटात औशीम खेतरपाल, आकाश वर्मा, राधिका खेतरपाल, सार्थक कपूर, प्रिन्स राजीव, एन. के. सिंग, भाव्या सिंग, राज चौधरी, रनेशा अग्रवाल, अभिषेक सिन्हा, शोभना खत्री आणि अनु शर्मा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. चिल्ड्रेन ऑफ गॉड हा चित्रपट येत्या *११ सप्टेंबर* रोजी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होत असून, मानवता, समानता आणि निःस्वार्थ स्वीकाराचा हृदयस्पर्शी संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणार आहे

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ : भारतासाठी सुवर्णसंधी

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ ही केवळ पदकांची शर्यत नाहीत, तर राष्ट्रांच्या क्रीडा सामर्थ्याची, शिस्तीची आणि जिद्दीची कसोटी आहेत. जगभरातील ७४ राष्ट्रकुल देशांतील हजारो खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून प्रत्येक खेळाडू आपल्या देशाचा तिरंगा उंचावण्याचे स्वप्न उराशी बाळगून मैदानात उतरला आहे. यंदाची स्पर्धा आर्थिक शिस्त आणि उपलब्ध पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर या संकल्पनेवर आधारित असल्यामुळे या पूर्वीच्या स्पर्धांपेक्षा आकाराने लहान असली तरी स्पर्धेची गुणवत्ता तितकीच उच्च आहे.

भारतासाठी ही स्पर्धा विशेष महत्त्वाची आहे. वेटलिफ्टिंग, बॉक्सिंग, कुस्ती, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स, नेमबाजीसारख्या अनेक क्रीडा प्रकारांत भारतीय खेळाडूंनी मागील काही वर्षांत सातत्याने जागतिक स्तरावर दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे यंदाही भारताकडून या स्पर्धेत मोठ्या पदकसंख्येची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेषतः मीराबाई चानू आणि इतर अनुभवी खेळाडूंसह युवा खेळाडूंवर देशाच्या आशा खिळल्या आहेत. मीराबाई चानूने तिच्याकडून देशवासीयांना असलेली अपेक्षा पूर्ण केली आहे. वेट लिफ्टर प्रकारात तिने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील तिचे हे सलग तिसरे सुवर्णपदक आहे. याआधीच्या दोन स्पर्धेतही तिने सुवर्णपदक जिंकले आहे. राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदकाची हॅट्रिक करणारी ती एकमेव भारतीय खेळाडू आहे म्हणूनच तिची ही कामगिरी ऐतिहासिक आहे. तिच्या या कामगिरीचा देशातील १४५ कोटी जनतेला अभिमान आहे. केवळ तीच नाही तर अन्य भारतीय खेळाडूंनी देखील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट सुरू केली आहे. ही आनंदाची बाब आहे. आज भारतात क्रीडा क्षेत्राला पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व दिले जात आहे. खेलो इंडियासारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना संधी मिळत आहे. आधुनिक प्रशिक्षण, आहार, क्रीडा विज्ञान आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा यामुळे भारतीय खेळाडूंचा आत्मविश्वास वाढला आहे. परिणामी भारत आता केवळ सहभागापुरता मर्यादित न राहता पदकांचा प्रबळ दावेदार म्हणून ओळखला जात आहे. तथापि, केवळ काही मोजक्या खेळांवर अवलंबून राहून चालणार नाही. ऑलिम्पिक आणि राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी तळागाळात क्रीडा संस्कृती रुजवणे, शालेय स्तरावर क्रीडेला प्रोत्साहन देणे, प्रशिक्षकांची गुणवत्ता वाढवणे आणि ग्रामीण भागात उत्कृष्ट क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा ही केवळ सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदकांची लढाई नाही; ती राष्ट्राच्या आत्मविश्वासाची, शिस्तीची आणि युवा शक्तीची ओळख आहे. प्रत्येक भारतीय खेळाडू मैदानात उतरतो तेव्हा त्याच्यासोबत १४५ कोटी भारतीयांच्या अपेक्षा आणि शुभेच्छा असतात. त्यांच्या यशातून देशातील नव्या पिढीला प्रेरणा मिळते आणि क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडवण्याची उमेद निर्माण होते.भारतीय खेळाडूंनी ग्लासगोमध्ये दमदार कामगिरी करून तिरंगा अधिकाधिक वेळा उंच फडकवावा, हीच प्रत्येक भारतीयाची अपेक्षा आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ भारतासाठी केवळ पदकांची नव्हे, तर नव्या क्रीडा युगाची सुरुवात ठरावी, हीच सदिच्छा.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**



सामाजिक बांधिलकी जपत गेली १५ वर्षे आदिवासी भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या आधार युवा प्रतिष्ठान ट्रस्ट लालबाग (तेजुकाया) या संस्थेच्या वतीने नुकतेच पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील वेढे, मुरबीपाडा, कोकणपाडा, चितावपाडा आणि करसुड येथील पाच शाळांमधील ३५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, छत्र्या, खाऊ तसेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषतः आदिवासी भागातील मुलांना आवश्यक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी संस्थेचे अध्यक्ष विशाल येवले, प्रो कबड्डीपटू विलास माने आणि संस्थेचे सचिव वानेक सदस्य उपस्थित होते.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात जनआक्रोश महामोर्चा....

## हजारो महिला-पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग; जय भीमच्या घोषणांनी शहर दणाणले...

**जाफ्राबाद - प्रतिनिधी**

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात जाफ्राबाद शहरात निळ्या जनसागराने अक्षरशः दुमदुमून गेले. विविध आंबेडकरी सामाजिक संघटना व समन्वय समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या भव्य जनआक्रोश महामोर्चात हजारो महिला-पुरुष, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि समाजबांधव उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. हातात निळे झेंडे, भारतीय संविधानाच्या प्रती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज, यांच्या प्रतिमा आणि मागण्यांचे फलक घेऊन निघालेल्या मोर्चामुळे शहरातील प्रमुख रस्ते निळेमय झाले होते. जय भीम, संविधान बचाव, उपवर्गीकरण रद्द करा, एकच मिशन- संविधान संरक्षण अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले. शहरातील प्रमुख मार्गांवरून शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आलेल्या या महामोर्चामुळे काही काळ वाहतुक ठप्प झाली होती.

मोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत विविध मान्यवरांनी केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांवर टीका करत अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण हा संविधानाच्या समतेच्या तत्त्वांवर घाला असल्याचा आरोप केला. शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. सभेला लाँग मार्चचे मुख्य प्रणेते सिद्धार्थ शिंगारे, प्रा. डॉ. ह. नी. सोनकांबळे, दादासाहेब शेळके, अजय सरोदे, सिद्धार्थ सुरडकर आणि रख्मिणीताई लोंढे यांनी मार्गदर्शन केले.

वक्त्यांनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे ठामपणे सांगितले. यावेळी बोलताना लाँग मार्चचे मुख्य प्रणेते सिद्धार्थ शिंगारे यांनी शासनाला थेट इशारा देत, ''उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घेतला नाही, तर आम्ही बीड ते दिल्ली असा सुमारे १,३०० किलोमीटरचा पायी लाँग मार्च काढणार आहोत. संविधान दिन, २६ नोव्हेंबरपासून या पदयात्रेला सुरुवात होईल आणि सलग दोन महिन्यांचा प्रवास करत २६ जानेवारी रोजी दिल्लीत पोहोचून आंदोलन छेडले जाईल. उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द होईपर्यंत लढा सुरूच राहील,'' अशी ठाम भूमिका मांडली.

महामोर्चानंतर आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शहरात जाफराबाद पोलीस प्रशासनाच्या वतीने कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# समाजकार्यातील योगदानाची दखल; नितीन कानडे यांची यशवंत संघर्ष सेना महाराष्ट्र प्रदेश महासचिवपदी नियुक्ती

**सिंधीकाळेगाव - प्रतिनिधी**

धनगर समाजाचे सामाजिक कार्यकर्ते नितीन कानडे यांची यशवंत संघर्ष सेना महाराष्ट्र प्रदेश महासचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि सामाजिक कार्यातील त्यांच्या योगदानाची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णु भाऊ कुरहाडे यांनी ही नियुक्ती जाहीर केली. संघटनेच्या बैठकीत त्यांच्या हस्ते नितीन कानडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.नितीन कानडे यांनी या नियुक्तीबद्दल संघटनेच्या नेतृत्वाचे आभार मानत, समाजातील सर्व घटकांना एकत्र घेऊन संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजहिताचे प्रश्न शासन दरबारी मांडणे, युवकांना संघटित करणे आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.या नियुक्तीबद्दल नितीन कानडे यांचे धनगर समाजासह विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार आणि समाजबांधवांकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# धक्कादायक! २० वर्षांच्या तरुणीकडून अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार

लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये सहसा मुली किंवा महिला पीडित असल्याच्या बातम्या समोर येतात, परंतु मुलांच्या बाबतीत घडणारे लैंगिक शोषणाचे प्रकारही गंभीर चिंताजनक आहेत. असाच एक धक्कादायक प्रकार दिल्लीतील चाणक्यपुरी परिसरात उघडकीस आला आहे, जिथे एका २० वर्षांच्या तरुणीवर एका अल्पवयीन मुलासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने संबंधित आरोपी तरुणीला काही कडक अटी लादवून नियमित जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात चाणक्यपुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता , २०२३ च्या कलम ३५१(२) आणि पॉक्सो कायदा , २०१२ च्या कलम ६/८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पीडित अल्पवयीन मुलाच्या आईने नियंत्रण कक्षाला फोन करून घटनेची माहिती दिली होती. तपासादरम्यान पोलिसांनी पीडित मुलाचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १८३ अंतर्गत नोंदवलेला जबाब आणि इतर पुरावे न्यायालयात सादर केले होते. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मनोज जैन यांच्या खंडपीठासमोर या जामीन अर्जावर सुनावणी पार पडली. सुनावणीदरम्यान न्यायालयाला कळवण्यात आले की, आरोपी तरुणी ही केवळ २० वर्षांची असून ती गेल्या साडेतीन महिन्यांहून अधिक काळापासून कोठडीत आहे. तिचा कोणताही पूर्व गुन्हेगारी इतिहास नसून तुरुंगातील तिची वर्तणूकही समाधानकारक राहिली आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणीला जोडल्या गेलेल्या पीडित मुलाच्या आईने, आरोपीने भविष्यात अशा कृत्यांपासून दूर राहिल्यास जामिनाला विरोध नसल्याचे स्पष्ट केले.

या प्रकरणात न्यायालयाने आरोपी तरुणीला १० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर आणि तितक्याच रकमेच्या हमीदारावर जामीन मंजूर केला आहे. जामीन मंजूर करताना न्यायालयाने कडक अटी घातल्या असून आरोपी तरुणीला पीडित कुटुंबापासून पूर्ण अंतरावर राहावे लागेल, तिचे सध्याचे निवासस्थान बदलावावे लागेल आणि साक्षीदारांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्क साधता येणार नाही. तसेच तपासाधिकारी यांच्याकडे स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक चालू स्थितीत देणे अनिवार्य करण्यात आले आहे.

या प्रकरणी कायदेशीर बाबींवर भाष्य करताना ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी सांगितले की, ''आपल्या समाजात लैंगिक अत्याचाराचे बळी फक्त मुली किंवा महिलाच पडतात असा एक मोठा गैरसमज आहे. मात्र, ही घटना स्पष्ट करते की मुलांवरही तितक्याच गंभीर स्वरूपाचे लैंगिक अत्याचार होतात. पॉक्सो कायदा हा लिंग-तटस्थ कायदा असून तो मुला-मुलींमधील भेदभाव न करता प्रत्येक अल्पवयीन बालकाचे लैंगिक शोषणापासून संरक्षण करतो. मुलांवरील अत्याचाराच्या घटना उजेडात येणे आणि पीडित कुटुंबांनी न्यायासाठी पुढे येणे हा समाजातील एका महत्त्वाच्या मुद्द्यावर प्रकाश टाकणारा टप्पा आहे.'' एकूणच, बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि कायद्याच्या योग्य अंमलबजावणीच्या दृष्टीने न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. महिला असो वा पुरुष, बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार हा एक अत्यंत गंभीर गुन्हेगारी प्रकार असून त्याविरोधात कठोर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक असल्याचे या प्रकरणावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.


# RTE कायद्याच्या कलम २३ मध्ये सुधारणा करून सेवेतील शिक्षकांना मधून कायमस्वरूपी सूट द्या : शेख अब्दुल रहीम

## नवनियुक्त केंद्रीय शिक्षणमंत्री प्रल्हाद जोशी, दोन्ही शिक्षण राज्यमंत्री यांना थेट निवेदन सादर!

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा ( , २००९) च्या कलम २३ मध्ये आवश्यक ती वैधानिक सुधारणा करून सेवेतील सर्व शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा () मधून कायमस्वरूपी सूट देण्यात यावी, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या वतीने शेख अब्दुल रहीम यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री मा. श्री. प्रल्हाद जोशी तसेच शिक्षण राज्यमंत्री मा. डॉ. सुकांत मजूमदार आणि मा. श्री. जयंत चौधरी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देशातील व राज्यातील बहुतांश शिक्षकांनी शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या डी.एड. (..), बी.एड. (..) यांसारख्या व्यावसायिक व शैक्षणिक अर्हता पूर्ण करून तसेच नियुक्तीच्या वेळी लागू असलेल्या सर्व कायदेशीर नियमांचे पालन करूनच सेवेत प्रवेश केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हे शिक्षक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अविरत सेवा देत आहेत.



**नैसर्गिक न्यायतत्त्वाचा भंग:**

नवीन रुजू होणाऱ्या शिक्षकांच्या गुणवत्तेच्या पडताळणीकरिता ही अट योग्य असू शकते; परंतु नियुक्तीच्या वेळी सर्व अटी पूर्ण करून प्रदीर्घ अध्यापन अनुभव पाठीशी असलेल्या कार्यरत शिक्षकांवर आता पूर्वलक्षी प्रभावाने ची अट लादणे हे नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या ( ) पूर्णपणे विरोधात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखत, विद्यमान कायद्यातील या त्रुटी दूर करण्यासाठी कायद्यातच सकारात्मक सुधारणा करणे ही काळाची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

**प्रमुख मागण्या:**

कायद्यात दुरुस्तीची शिफारस: नियुक्तीच्या वेळी योग्य अर्हता धारण करणाऱ्या कार्यरत शिक्षकांना मधून कायमस्वरूपी सूट मिळण्यासाठी राज्य शासनाने तातडीने केंद्र सरकारकडे कायदा, २००९ च्या कलम २३ मध्ये दुरुस्तीबाबतचा अधिकृत प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा.

सेवा संरक्षणाची हमी: केवळ उत्तीर्ण नसल्याच्या कारणावरून दीर्घकाळ सेवेत असलेल्या कोणत्याही शिक्षकाची सेवा खंडित केली जाऊ नये किंवा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होऊ नये. त्यांच्या सेवा संरक्षणाची स्पष्ट व ठोस धोरणात्मक हमी सरकारने द्यावी.

अनुभवालाच अर्हतेचा दर्जा: सेवेतील शिक्षकांचा प्रदीर्घ अध्यापन अनुभव हीच त्यांची खरी योग्यता मानून त्यांना या परीक्षेतून पूर्णपणे मुक्त करण्यात यावे.

''लाखो शिक्षकांचे कौटुंबिक स्थैर्य, सेवा-सुरक्षा आणि आत्मसन्मान यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून केंद्र व राज्य सरकारने यावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.''

शेख अब्दुल रहीम (राज्य प्रवक्ते: महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन / संस्थापक अध्यक्ष: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन)

या निवेदनाची प्रत भारत सरकारच्या शालेय शिक्षण सचिवांनाही पुढील योग्य त्या कारवाईसाठी पाठवण्यात आली आहे...





गुरुपौर्णिमा निमित्त श्रीराम मंदिराचे पुजारी परमपूज्य मनोज महाराज गड यांचे गुरुपूजन करून शौल पुष्पहार श्रीपाल देऊन पुष्पवृष्टी करत सत्कार करण्यात आले यावेळी सुरजप्रसाद शुक्ला, राजेंद्र राठी ,किशोरजी पंजाबी, सुरेश अग्रवाल, दीपक सारस्वत, अनिल जयस्वाल , संजय नागोरी, प्रकाश जोशी,पवन अग्रवाल,प्रथम बागडी, कविता तलरेजा, पुष्पा सारस्वत,मीनाक्षी सारस्वत, मीना जोशी, अनिता बंसल, कुशुवर्ता शेंडगे, माया पाटील, मंजू भावसार,महिला मंडळ(छाया/जावेद तंबोली)

**राज्यातील ओबीसी, ईबीसी आणि डीएनटी प्रवर्गातील**

## ९ वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांना पीएम यशस्वी शिष्यवृती योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील इतर मागासवर्गीय (), आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील () आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती () या प्रवर्गातीलकेंद्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयामार्फत चालवल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर () ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. शासन शुध्दीपत्रकान्वये इतर मागासवर्गीय आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील () आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत सन २०२६-२७ शिष्यवृत्ती योजनाही संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक संचालक इतर मागस बहुजन कल्याण यांच्यामार्फत राबविण्यात आलेली आहे. मान्यताप्राप्त टॉप क्लास शाळांमध्ये चालू वर्षातइयत्ता ९ वी आणि ११ वीमध्ये शिकत असलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांनी स्वतःचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत **(पान २ वर)**

## पेपरफुटी प्रकरणी काँग्रेस आक्रमक; उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि मंत्री दादा भुसे यांच्या राजीनाम्याची मागणी

ड्रग इन्स्पेक्टर भरती व टीईटी पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात; -जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन, -जनआंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील ड्रग इन्स्पेक्टर भरती परीक्षा आणि टीईटी () पेपरफुटीच्या कथित प्रकरणांमुळे स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता धोक्यात आली असून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत.

असल्याचा आरोप करत जालना शहर काँग्रेस कमिटीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत शासनाला निवेदन सादर केले. या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई



करावी तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून संबंधित मंत्री दादा भुसे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी काँग्रेसने केली.

शहर महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे यांच्या न े त ृ त्‍ व ा ख ा ल ी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व संबंधित विभागाकडे हे निवेदन पाठविण्यात आले. राज्यात वारंवार उघड होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे परिश्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शासनावरील विश्वास डळमळीत झाला असून, पात्र उमेदवारांवर अन्याय होत असल्याची भावना तीव्र होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काँग्रेसने म्हटले आहे की, बेरोजगार युवक-युवती मोठ्या आर्थिक खर्चासह मानसिक ताण सहन करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. मात्र पेपरफुटी, भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून अपात्र उमेदवारांना संधी मिळत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले.

निवेदनात ड्रग इन्स्पेक्टर भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीची उच्चस्तरीय चौकशी, टीईटीसह अन्य भरती परीक्षांतील दोषींवर कठोर फौजदारी कारवाई, गैरव्यवहारात सहभागी **(पान २ वर)**

## शासकीस मुलींच्या वसतिगृहात प्रवेशसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना – प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता जालना शहरात नव्याने सुरु होणारे आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, हॉटेल योजना इमारत, निरामय हॉस्पीटल शेजारी, रेल्वे स्टेशन रोड,जालना येथे प्रवेशासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरु करण्यात आली असून या अनुषंगाने अनुसूचित जमातीच्या इच्छुक मुलींनी/विद्यार्थिंनींना www.swayam.mahaonline.gov.in या संकेत **(पान २ वर)**

## उपाहारगृहात बिल पाहताना खबरदारी घ्या: चायोसला सेवा शुल्क आकारणे पडले महाग; केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाचा मोठा दणका

**जालना । प्रतिनिधी**

हॉटेल्स आणि उपाहारगृहांमध्ये जेवणाचा आनंद घेतल्यानंतर बिलामध्ये सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) लावून ग्राहकांची होणारी अडवणूक आता थांबणार आहे. राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनवर नोंदवलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेत केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने (सीसीपीए) प्रसिद्ध चायोस (सनशाईन टी हाऊस प्रायव्हेट लिमिटेड) या उपाहारगृह साखळीला ग्राहकाकडून बेकायदेशीरपणे वसूल केलेले सेवा शुल्क परत करण्याचे आणि तब्बल ५०,००० रुपयांचा दंड भरण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवा शुल्क अनिवार्यपणे आकारणे बेकायदेशीर असतानाही सॉफ्टवेअर प्रणालीचा वापर करून ग्राहकांच्या बिलात ते आपोआप जोडले जात असल्याचे चौकशीत उघड झाले. या निर्णयामुळे देशभरातील लाखो ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला असून, कोणत्याही हॉटेल किंवा उपाहारगृहात सेवा शुल्क देणे हे पूर्णपणे ऐच्छिक असणार आहे आणि ग्राहकाच्या परवानगीशिवाय ते बिलात जोडता येणार नाही.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अत्यंत रंजक आणि प्रत्येक ग्राहकासाठी महत्त्वाची आहे. शशांक सूद नावाच्या एका जागृत ग्राहकाने ग्रेटर नोएडा येथील चायोस केंद्रात खाद्यपदार्थ खरेदी केले. बिलात वस्तू व सेवा कराव्यतिरिक्त (जीएसटी) १५.३३ रुपये सेवा शुल्क म्हणून आकारण्यात आले होते. ग्राहकाने हे शुल्क हटवण्याची विनंती केली असता उपाहारगृहाने व्यवस्थापनाच्या धोरणाचे कारण देत नकार दिला. यावर ग्राहकाने ३० मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनकडे तक्रार नोंदवली. प्राधिकरणाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली असता, उपाहारगृहाने ऐच्छिक सेवा शुल्क असे नाव देऊन सॉफ्टवेअरद्वारे प्रत्येक बिलात हे शुल्क आपोआप जोडले असल्याचे समोर आले. प्राधिकरणाने नमूद केले की, ग्राहक जेव्हा मेनू कार्ड पाहून ऑर्डर **(पान २ वर)**

## अपंग जनता दलाच्या मागण्यांना आयुक्त सत्यजीत बडे यांचा सकारात्मक प्रतिसाद; लवकरच महत्त्वाचे निर्णय होणार

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील दिव्यांगांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी अपंग जनता दलाच्या शिष्टमंडळाची अपंग सक्षमीकरण आयुक्त सत्यजीत बडे यांच्यासोबत सुमारे एक तास सविस्तर बैठक पार पडली. ही बैठक अत्यंत सकारात्मक वातावरणात झाली असून संघटनेने मांडलेल्या प्रमुख मागण्यांवर शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिल्याची माहिती अपंग जनता दलाने दिली.




बैठकीत अपंग जनता दलाचे संस्थापक अध्यक्ष अनिस शेख (पत्रकार) यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महाराष्ट्रातील दिव्यांग बांधवांच्या अनेक महत्त्वाच्या समस्या आयुक्तांसमोर मांडल्या. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दिव्यांगांना दरमहा ₹६,००० मानधन देणे, जिल्हा नियोजन समितीतील दिव्यांगांसाठी राखीव १ टक्का निधी तातडीने खर्च करण्यासाठी शासनाने मार्गदर्शक सूचना व जीआर जारी करणे, राज्य परिवहन व इलेक्ट्रिक बसमध्ये दिव्यांगांना सवलत देणे, विशेष शिक्षकांसाठी राज्यस्तरीय ''आदर्श विशेष शिक्षक पुरस्कार'' सुरू करणे, अपंग अनुशेषातील नोकऱ्यांची फेरपडताळणी करणे, एका डोळ्याने किंवा एका कानाने दिव्यांग असलेल्या व्यक्तींना किमान ५० टक्के अपंगत्व प्रमाणपत्राबाबत योग्य निर्देश देणे, तसेच खासदार व आमदार निधीतील ५ टक्के निधी दिव्यांग कल्याणासाठी खर्च करणे अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

याशिवाय शासकीय कार्यालयांच्या आवारात दिव्यांगांच्या स्व-रोजगारासाठी १० बाय १० फुटांची जागा उपलब्ध करून देणे तसेच ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही अशा दिव्यांगांना जागा खरेदीसाठी ₹१ लाखांचे आर्थिक सहाय्य देऊन घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी आयुक्त सत्यजीत बडे यांनी अनेक मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतली. जिल्हा नियोजन समितीतील १ टक्का निधी खर्च करण्यासाठी लवकरच शासन निर्णय () काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल, तसेच दिव्यांगांना शिवशाही व इलेक्ट्रिक बसमधील सवलतीबाबत आवश्यक आदेश काढण्याचा विचार सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. विशेष शिक्षक पुरस्काराबाबतही शासन सकारात्मक विचार करेल, असे आश्वासन त्यांनी दिले.

तसेच, जागा नसलेल्या दिव्यांगांना जागा खरेदीसाठी आर्थिक सहाय्य देऊन घरकुल उपलब्ध करून देण्याबाबतही शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही आयुक्त बडे यांनी स्पष्ट केले. या बैठकीस अपंग जनता दलाचे संस्थापक अध्यक्ष **(पान २ वर)**

# गंभीर गुन्ह्याच्या तयारीत असलेल्या तरुणास गावठी पिस्तूलासह अटक

## कदीम जालना पोलिसांची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडण्यापूर्वीच तो हाणून पाडण्यात कदीम जालना पोलिसांना यश आले आहे. गुप्त माहितीच्या आधारे शास्त्री मोहल्ला परिसरात सापळा रचून कारवाई करत एका तरुणाकडून गावठी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतूस आणि मोबाईल असा एकूण ₹३५,५०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन (जे. बी.) शेवाळे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शास्त्री मोहल्ला, कुच्चरवटा, जुना जालना परिसरात एक इसम कमरेला देशी बनावटीचे पिस्तूल बाळगून गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत आहे.

माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तातडीने विशेष पथक तयार केले. संबंधित परिसरात सापळा रचून संशयितावर नजर ठेवण्यात आली. काही वेळातच संशयित इसम दिसताच पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले.

अंगझडतीत गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त पंचांसमक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला एक देशी बनावटीचे गावठी




पिस्तूल आढळून आले. पिस्तुलाच्या मॅगझीनमध्ये एक जिवंत काडतूस भरलेले होते. तसेच त्याच्या पँटच्या खिशातून सॅमसंग गॅलेक्सी ०५ कंपनीचा फिकट हिरव्या रंगाचा मोबाईल फोनही जप्त करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळीच आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी कदीम जालना पोलीस ठाण्यात आणले. शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाणे गुन्हा क्रमांक ४०८/२०२६ अन्वये शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव करण गणेश कांबळे (वय २२, रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना) असे आहे. ₹३५,५०० किमतीचा मुद्देमाल जप्त कारवाईदरम्यान पोलिसांनी खालील मुद्देमाल जप्त केला आहे एक देशी बनावटीचे पिस्तूल (मॅगझीनसह) ₹२५,०००

एक जिवंत काडतूस ₹५०० सॅमसंग गॅलेक्सी ०५ मोबाईल ₹१०,००० एकूण जप्त मुद्देमाल ₹३५,५०० शस्त्र कोठून आणले? तपास सुरू आरोपीकडे गावठी पिस्तूल कसे आले, ते कोणी पुरविले, त्यामागे कोणते गुन्हेगारी जाळे कार्यरत आहे का, तसेच तो नेमका कोणत्या गंभीर गुन्ह्याच्या तयारीत होता, याचा सखोल तपास कदीम जालना पोलीस करत आहेत. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक मच्छींद्र वाघ, पोलीस हेड कॉन्स्टेबल सदा राठोड, सचिन चौधरी, पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख, इम्रान खान, प्रशांत गायकवाड, समाधान लंबे आणि कृष्णा चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला. गंभीर गुन्हा घडण्यापूर्वीच गुप्त माहितीच्या आधारे आरोपीला गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतुसासह अटक करण्यात आल्याने कदीम जालना पोलिसांच्या सतर्कतेचे आणि तत्पर कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.